॥ सा विद्या या विमुक्तये ॥

# स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत

# SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED

'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA

Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

**Fax : (02462) 215572**

**Phone: (02462) 215325**

## Public Relations Office (PRO)

**जनसंपर्क कार्यालय**

**website: srtmun.ac.in**

**E-mail: pro@srtmun.ac.in**

संदर्भ क्र.: ज.का./२०२३-२४/२८९ दि.९/०१/२०२४

### 'स्वारातीम' विद्यापीठाच्या कैलास जाधव ला ऑल इंडिया बॉक्सिंग स्पर्धेत कांष्य पदक

चंदीगड येथे चंदीगड विद्यापीठाद्वारे २ ते ५ जानेवारी २०२४ या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आलेल्या ऑल इंडिया (पुरुष) बॉक्सिंग टूर्नामेंट २०२३-२४ साठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे ५ खेळाडू पात्र झाले होते. त्यामध्ये ५४ -५७ या वजनगटात कैलास जाधव यांनी आपल्या खेळाचे चांगले प्रदर्शन करीत जीएनए विद्यापीठ पगवाडा, डॉ बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ शिखाकुल्लम, मुंबई विद्यापीठ, मुंबई हया विद्यापीठाच्या प्रतिस्पर्ध्यावर मात करीत कांष्य पदक जिंकून ऑल इंडिया बॉक्सिंग स्पर्धेत स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा नावलौकिक वाढविला.

५१-५४ वजनगटात निखिल शिंदे, ५७-६० वजनगटात संतोष गुट्टे, ८०-८६ वजनगटात अभिमन्यू कवतकवार, ९२+ वजनगटात शुभम चौधरी या सर्व बॉक्सिंग खेळाडूंनी आपल्या खेळाचे चांगले प्रदर्शन केले.

बॉक्सिंग या खेळामध्ये विद्यापीठाला पहिल्यांदाच ऑल इंडिया बॉक्सिंग स्पर्धेत पदक प्राप्त झाले आहे. यशस्वी खेळाडूंना श्री. शामगीर महाविद्यालयाचे क्रीडा संचालक डॉ. संपत साळुंके, बहिर्जी नाईक महाविद्यालयाचे शारीरिक शिक्षक डॉ. संतोष पोले यांचे मार्गदर्शन लाभले.

खेळाडूंच्या या यशाबद्दल विद्यापीठाचे क्रीडा संचालक डॉ. मनोज रेड्डी, माजी व्यवस्थापन समिती सदस्य डॉ. प्रदीप देशमुख यांनी पात्र व पदक विजेत्या खेळाडूंचे अभिनंदन केले.

---